बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि २९ जानेवारी २०२४**

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २८/२०२४ भादवि ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २७/०१/२०२४ रोजी २३.०० वा चे सुमारास, कुंभार वेस मधुन कौंतम चौक, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २८/०१/२०२४ रोजी ०१.०६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | आनंद गुरुसिध्दप्पा भावे, वय- २० वर्षे, रा. गणेश नगर, भवानी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) योगेश कोळकर, रा. धाकटा राजवाडा, सोलापूर, २) आकाश सोनवणे, व इतर दोघे नाव पत्ता माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व त्याचे दोन मित्र श्रवण व रोहित असे कुंभार वेस ते कौंतम चौक असे आई साठी गोळया आणण्यासाठी जात होते. तेव्हा फिर्यादीचे ओळखीचे यातील नमुद आरोपीत हे तेथे थांबले होते व त्यांनी फिर्यादीस हाक मारुन थांबविले व तु कोठे चालला आहे. त्यावेळी फिर्यादी यांनी आई आजारी आहे त्यांना गोळया आणण्यासाठी चाललो आहे असे म्हणताच, तुला अलीकडे लई मस्ती आली आहे, तुझी मस्ती जिरवली पाहिजे, तुला बघितले पाहिजे काय असे म्हणून शिवीगाळ करुन हाताने व लाथाबुक्याने मारहाण करु लागले. तेव्हा वरील आरोपीतांनी रस्त्याच्या बाजुस पडलेले फरशीचे तुकडे उचलुन आरोपीत क्रं.१ याने फिर्यादीचे उजवे कपाळावर मारले व आरोपीत क्रं. २ याने हाताच्या बोटारवर जोरात मारले व इतर दोघांनी तु या रोडवरुन यापुढे कसे जातो अशी दमदाटी करत फरशीच्या तुकडयांनी मारुन जखमी केले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ ३९९ दुधाळे- ९८२३२५२५०३ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३२/२०२४ भादवि ३०२ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १३/०१/२०२४ रोजी २०.०० वा चे सुमारास, सोलापूर-तुळजापूर हायवे रोडवरील सर्विस रोडलगत नाल्याजवळ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २८/०१/२०२४ रोजी २२.३७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सौ. किर्ती विजय बट्टु, वय- ३३ वर्षे, रा. १०/५७/६०, भवानी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | विजय सिद्राम बट्टु, वय- ४३ वर्षे, रा. १०/५७/६०, भवानी पेठ, सोलापूर |
| **मयताचे नाव** | : | विशाल विजय बट्टु, वय- १४ वर्षे, रा. १०/५७/६०, भवानी पेठ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादीचे पती(आरोपीत) यांनी फिर्यादीचा मुलगा विशाल विजय बट्टु, वय- १४ वर्षे, यास त्याचे शाळेतील सततच्या तक्रारी, अभ्यास न करणे, घरात व शाळेत खोडया करणे, सतत मोबाईल पाहणे याचा राग मनात धरुन वरील वेळी व ठिकाणी निर्मनुष्य ठिकाणी मोटार सायकलवर घेवून जावुन त्यास थम्सअप मध्ये सोडीयम नायट्रेटची विषारी पावडर मिसळुन, मुलगा विशाल यास पाजुन जिवे ठार मारले आहे म्हणून. तपास:- पोनि- जगताप- ८३२९२९५०५१ |